# पुणे विद्यापीठ

परिपत्रक क्रमांक :२४५/२०१२

या परिपत्रकाद्वारे सर्व संबंधितांना कळविण्यात येते की, विद्यापीठ अधिकार मंडळाने घेतलेल्या निर्णयानुसार शैक्षणिक वर्ष २०१०–११ साठी एम. फिल अभ्यासक्रमास प्रवेश घेतलेल्या सर्व विद्यार्थ्यांना दरमहा रु. ३०००/– व पीएच.डी. अभ्यासक्रमासाठी प्रत्येकी दोन विद्यार्थ्यांना दरमहा रु. ६०००/– खालील नियम व अटींनुसार शिष्यवृत्ती देण्यात आलेली आहे.

१) एम. फिल. अभ्यासक्रमासाठी सन २०१०–११ पासून प्रवेश घेण्यात आलेल्या विद्यार्थ्यांना त्यांच्या नावनोंदणी झालेल्या दिनांकापासून/तात्पुरता प्रवेश (Provisional Admission) देण्यात आलेल्या दिनांकापासून पुढे १८ (अठरा) महिन्यांच्या कालावधीसाठी अथवा त्यांच्या नोंदणी झालेल्या दिनांकापासून/तात्पुरता प्रवेशाच्या (Provisional Admission) दिनांकापासून शोधनिबंध सादर करण्याच्या तारखेपर्यंत, यामध्ये जे प्रथम घडेल तोपर्यंत शिष्यवृत्ती देण्यात येईल.

२) पीएच.डी. अभ्यासक्रमासाठी सन २०१०–११ आणि २०११–१२ पासून प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना त्यांच्या नावनोंदणी झालेल्या दिनांकापासून/तात्पुरता प्रवेश (Provisional Admission) देण्यात आलेल्या दिनांकापासून पुढे दोन वर्षांच्या कालावधीसाठी शिष्यवृत्ती मान्य करण्यात आली होती. मा. व्यवस्थापन परिषदेचा ठराव क्र. म:१३७/२९०५१२ नुसार सदरची मुदत चार वर्षे करण्यात आलेली आहे.

३) प्रत्येक विद्यार्थ्याची हजेरी त्यांचे मार्गदर्शक व संबंधित विभागप्रमुखांनी स्वत:च्या स्वाक्षरीने प्रमाणित करायची आहे.

४) पीएच.डी. व एम. फिल. अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना पीएच.डी./एम. फिल. साठी आवश्यक असणारे सर्व नियम व अटी बंधनकारक राहतील.

५) पीएच.डी./एम. फिल. साठी नोंदणी केलेल्या विद्यार्थ्यांना अन्य कोणत्याही शिष्यवृत्तीचा लाभ घेता येणार नाही.

६) एम. फिल. अभ्यासक्रमासाठी विद्यार्थ्यांची पूर्णवेळ नोंदणी होणे आवश्यक आहे.

संचालक
म.वं.वि.वि.मं

गणेशखिंड, पुणे ४११ ००७ }
संदर्भ क्र. : प.प्रवेश/5543 }
दिनांक : 24/12/2012 }